आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक वृत्त विभाग
प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
मंगळवार दिनांक २४ मार्च २०२६

ठळक बातम्या

- अनुसूचित जाती आणि जमाती दर्जा फक्त हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्मीयांनाच मिळू शकेल, असा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय.
- ८ तास आधी रेल्वे तिकीट रद्द केल्यास कुठलाही परतावा नाही - रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची माहिती.
- 'राजमाता जिजाऊ' या अत्याधुनिक स्मार्ट बस सेवेचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण; नागपुरातून सेवेला प्रारंभ.
- येत्या काही तासांत यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात हलक्या पावसाची शक्यता.

सर्वोच्च न्यायालय

हिंदू, शीख किंबा बौद्ध धर्माची अनुयायी असणारी व्यक्तीच अनुसूचित जाती आणि जमातींसाठीच्या फायद्यांसाठी दावा करू शकेल. ख्रिस्ती धर्मासारख्या इतर कोणत्याही धर्मात धर्मांतर करणाऱ्या व्यक्तिची अनुसूचित जातीची श्रेणी रद्द होईल, असं सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलं आहे. या तीन धर्मांव्यतिरिक्त इतर धर्मांत धर्मांतर केलेली कोणतीही दलित व्यक्ती अनुसूचित जाती आणि जमातींवरच्या अत्याचार प्रतिबंधक कायद्याचं उल्लंघन झाल्याचा दावा करू शकत नाही, असं न्यायालयाने म्हटलं आहे. आंध्र प्रदेशातल्या एका ख्रिस्ती धर्मगुरूने उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. त्यावर न्यायमूर्ती पी.के.मिश्रा आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या पीठासमोर आज सुनावणी झाली. संबंधित याचिकाकर्त्याने यापूर्वी आपल्यासोबत जातीय भेदभाव आणि छळ होत असल्याचा दावा करत काही जणांविरुद्ध खटला दाखल केला होता. मात्र आरोपींनी हा खटला रद्द करण्यासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. याचिकाकर्त्याने ख्रिस्ती धर्मात धर्मांतर केल्यामुळे त्याची अनुसूचित जातीची श्रेणी रद्द होत असल्याचा निर्णय उच्च न्यायालयानेही दिला होता.

मोदी राज्यसभा निवेदन

पश्चिम आशियात सुरू असलेल्या गंभीर परिस्थितीचे परिणाम दीर्घकाळ राहतील, त्यामुळे आपल्याला अशा परिस्थितीसाठी एकजूट दाखवावी लागेल, याचा पुनरुच्चार पंतप्रधान  नरेंद्र मोदी यांनी केला. पश्चिम आशियातल्या संघर्षावर त्यांनी आज राज्यसभेत निवेदन दिलं, त्यावेळी ते बोलत होते.

खरात

नाशिकमधल्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यांनी आज विधानसभेत निवेदन केलं. या प्रकरणात आतापर्यंत आठ गुन्हे दाखल झाले असून तपास सुरू आहे असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. विशेष तपास पथकामार्फत प्रकरणाचा तपास सुरू असून या पथकाचं नेतृत्व महिला अधिकाऱ्याकडे दिल्याचं त्यांनी सांगितलं. दरम्यान जादू टोणा तसेच दैवी शक्तीच्या नावाखाली महिलांचे लैंगीक शोषण करणाऱ्या बनावट कॅप्टन अशोक खरात याच्या कोठडीत नाशिकच्या न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस वाढ केली आहे.

समन्वय समितीची बैठक

नागपुरात भारत सरकारचे अनेक विभाग आणि संस्था कार्यरत आहेत. केंद्र शासनाच्या विविध योजना आणि उपक्रम या संस्था राबवत आहेत. त्या लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी या सर्व संस्था आणि विभागांत संवाद आणि सहकार्य असणं आवश्यक आहे, त्यासाठी आंतर माध्यम प्रसिद्धी समन्वय समिती महत्वपूर्ण कार्य करते, असं प्रतिपादन पत्र सूचना कार्यालयाच्या पश्चिम विभागाच्या महानिदेशक सीमा वत्स शर्मा यांनी केलं. पत्र सूचना कार्यालयद्वारा आयोजित आंतर माध्यम प्रसिद्धी समन्वय समितीची बैठक आज नागपुरातील चिटणवीस सेंटर इथं पार पडली, त्यावेळी त्या बोलत होत्या. मुंबई आणि पुण्यानंतर ही बैठक नागपुरात आयोजित करण्यात आली असून डिजिटल प्रसिद्धीसाठी क्षमता वर्धन कार्यशाळा आयोजित करण्याचा मानस शर्मा यांनी प्रतिपदित केला. पत्र सूचना कार्यालय, मुंबईच्या उपसंचालक जयदेवी पुजारी स्वामी यांनी  विविध विभागांद्वारा राबविल्या जाणाऱ्या योजना आणि उपक्रमांची प्रसिद्धी करण्यासाठी पत्र सूचना कार्यालय करत असलेल्या कामावर यावेळी प्रकाश टाकला. **NADT**, टपाल खातं, रेल्वे, एम्स, **NDRF**, **IIM**, **BSNL**, **NTPC**, **NHAI**, दूरदर्शन, आकाशवाणी, यांसारख्या केंद्र सरकारच्या **40** पेक्षा अधिक संस्थांनी या बैठकीत सहभाग नोंदविला.

रेल्वे तिकिट

भारतीय रेल्वेनं तिकीट रद्द करण्याच्या शुल्कात बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रवासाला ८ तास शिल्लक असताना रेल्वेचं तिकिट रद्द केलं तर कुठलाही परतावा मिळणार नाही, अशी माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत दिली.

सध्या ४ तास आधी तिकिट रद्द केलं तर कुठलाही परतावा मिळत नाही. प्रवास सुरू व्हायला ७२ तासापेक्षा कमी वेळ आणि २४ तासापेक्षा जास्त वेळ शिल्लक असेल तर रेल्वेच्या भाड्याच्या २५ टक्के शुल्क आकारले जाईल. सध्या ४८ तासापेक्षा जास्त आणि १२ तासापेक्षा कमी कालावधीत तिकिट रद्द केलं तर २५ टक्के शुल्क कापले जाते. प्रवासाला सुरुवात करायला २४ तासापेक्षा जास्त आणि ८ तासापेक्षा कमी वेळ शिल्लक असेल तर ५० टक्के रद्दीकरण शुल्क आकारले जाईल. सध्या १२ तासापेक्षा कमी आणि ४ तासापेक्षा जास्त वेळ असेल तर ५० टक्के शुल्क आकारले जात होते. प्रवाशांच्या सुविधेसाठी प्रवास सुरू व्हायच्या अर्धा तास आधीपर्यंत प्रवास सुरू करण्याचे ठिकाण बदलण्याची सुविधा रेल्वेनं उपलब्ध करुन दिली आहे. यापूर्वी चार्ट तयार व्हायच्या आधीच प्रवास सुरू करण्याचे ठिकाण बदलता येत होते.

राजमाता जिजाऊ बस

'राजमाता जिजाऊ' या अत्याधुनिक स्मार्ट बस सेवेच लोकार्पण मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज पार पडलं.या सोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, यांसह विधीमंडळ सदस्य, वरिष्ठ अधिकारी आणि उद्योग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. दोन बाय तीन आसन रचनेच्या या बसमधे ५६ जणांची आसन व्यवस्था आहे. ही बस राज्याच्या कानाकोपऱ्यात नागरिकांना वाहतुक सेवा देईल, असं परिवहन मंत्री तथा एस टी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सांगितलं....

या योजनेअंतर्गत पहिल्या ५० बसेस नागपूर इथून सेवा देण्यास सुरवात करत आहेत. या उपक्रमामुळे सार्वजनिक वाहतूक अधिक सुरक्षित, सक्षम आणि प्रवासी-केंद्रित होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

कुळवहिवाट

महाराष्ट्र कुळवहिवाट आणि शेतजमीन कायदे सुधारणा विधेयक २०२६ आज विधानसभेत मंजूर झालं. कुळाला मालकीहक्क दिल्यानंतर दहा वर्षांनी विक्री परवानगी देताना आकारायची चाळीसपट रक्कम रद्द करणं, वर्ग २ ची जमीन वर्ग १ ची करूनच खरेदी करणं आदी तरतुदी यात आहेत. औद्योगिक वापरासाठी जमीन खरेदी करताना आवाक्याबाहेरची परिस्थिती निर्माण झाली तर खरेदीला मुदतवाढ देण्याची तरतूद यात आहे. यानुसार जमीन खरेदी करून दहा वर्षे झाली असतील आणि ती वापरात आली नसेल तर तीन वर्षांची तसंच १५ वर्ष झाली असतील तर तीन वर्षांची मुदतवाढ देण्यात येणार आहे.

दत्तात्रय मेघे शोक प्रस्ताव / विधान परिषद

विधानपरिषदेचे माजी सदस्य आणि माजी मंत्री दत्तात्रय मेघे यांच्या निधनाबद्दलचा शोकप्रस्ताव आज विधानपरिषद सभापती राम शिंदे यांनी वाचून दाखवला. मेघे यांचा अल्पपरिचयही त्यांनी वाचला. त्यानंतर सर्व सभासदांनी दोन मिनिटं मौन पाळून मेघे यांना श्रद्धांजली वाहिली.

पेट्रोल'चा तुटवडा

आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर पेट्रोल तुटवडा होईल, अशा आशयाचा मॅसेज दोन दिवसापूर्वी समाज माध्यमावर पसरल्याने चंद्रपूर जिल्ह्यातील सर्वच पेट्रोल पंपावर नागरिकांच्या रांगा दिसून येत आहेत. जिल्हा प्रशासन सज्ज असून चंद्रपूर जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची पेट्रोल आणि डिझेलची टंचाई नाही. नागरिकांनी उगाच अफवांवर विश्वास ठेवू नये, अस आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केल आहे.

बोगस दिव्यांग प्रमाणपत्र

भंडारा जिल्ह्यात महसूल विभागात बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांवर नोकरी मिळवणाऱ्या अधिकाऱ्यांवर प्रशासनाने कारवाई करत ७ जणांची प्रमाणपत्रे बनावट असल्याच उघड केल. यापैकी ३ जणांना बडतर्फ, ३ जणांना निलंबित करण्यात आल असून एका नायब तहसीलदाराविरोधात बडतर्फीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला आहे.

नैसर्गिक शेतीशाळा

राज्यात विषमुक्त अन्नधान्य निर्मितीसाठी नैसर्गिक शेतीचा प्रसार करण्याच्या दृष्टीने कृषी विभाग आणि 'आत्मा' यांच्या सहकार्यान अकोल्यात राज्यातील पहिली शेतीशाळा आयोजित करण्यात येणार आहे. ११ एप्रिल रोजी होणाऱ्या या शेतीशाळेत शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीचे तंत्र, विषमुक्त उत्पादनाचे महत्त्व, तसेच खर्चात बचत करून उत्पादन वाढविण्याच्या पद्धतींबाबत मार्गदर्शन केल जाणार आहे.

हवामान

येत्या काही तासात विदर्भातील यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मेघगर्जनेसह वीजांचा कडकडाट, ताशी **30-40** किमी वेगाने वारे आणि अत्यंत हलक्या ते हलक्या पावसाची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. आज सकाळ पासून अधून मधून नागपुरात देखील ढगाळ वातावरण असल्यानं उकाडा वाढला आहे. आगामी एक -दोन दिवसात चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात हलक्या पावसासह वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे.

******